# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २१/११/२०२३**

## जिल्हा : पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान २९.९ ते ३२.२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १४.४ ते १८.७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ९२ ते ९८ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३३ ते ४५ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी १.२ ते २.३ कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ३२ ते ३३ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १५ ते १७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ६८ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ५४ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०७ ते १५ कि.मी. दरम्यान राहील. आकाश अंशतः ढगाळ ते ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा आग्नेयेकडून वायव्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (१५/११/२०२३ ते २१/११/२०२३) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२१/११/२०२३ ते २५/११/२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | दिनांक | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस (मिमी) | 0 | 0 | 1 | 14 | 24 |
| 31.3 | 30.5 | 30.7 | 29.9 | 31.0 | 32.2 | 31.3 | कमाल तापमान (अं.से.) | 33 | 33 | 33 | 33 | 32 |
| 16.3 | 14.4 | 14.4 | 14.7 | 16.9 | 18.7 | 17.4 | किमान तापमान (अं.से.) | 15 | 15 | 16 | 17 | 16 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 2 | 2 | 4 | 4 | 6 |
| 96 | 96 | 98 | 96 | 94 | 94 | 92 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 62 | 60 | 62 | 81 | 76 |
| 35 | 33 | 38 | 44 | 42 | 45 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 53 | 49 | 57 | 54 | 55 |
| 1.2 | 1.9 | 1.6 | 1.8 | 1.3 | 1.7 | 2.3 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 11 | 7 | 9 | 13 | 15 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 66 | 73 | 122 | 112 | 135 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २१, २२ व २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता असून दिनांक २४ व २५ नोव्हेंबर, २०२३ रोजी काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २४ व २५ नोव्हेंबर, २०२३ रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट, सोसाट्याच्या वाऱ्यासह (वाऱ्याचा वेग ताशी ४०-५० कि.मी.) पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २६ नोव्हेंबर, २०२३ ते ०२ डिसेंबर, २०२३ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |

| | | |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | | • जिल्हयात पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी तसेच उघड्यावरील ध्यान्य योग्य रित्या झाकून ठेवावे.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| गहू | उगवण अवस्था | पीक सुरूवातीपासूनच तण विरहीत ठेवणे आवश्यक आहे. पेरणीनंतर जरुरी प्रमाणे १ किंवा २ वेळा खुरपणी करावी. पीकच्या जोमदार वाढीसाठी पीक सुरूवातीपासूनच तण विरहीत ठेवावे. |
| हरभरा | पिक वाढीची अवस्था | पीकच्या जोमदार वाढीसाठी पीक सुरूवातीपासूनच तण विरहीत ठेवणे आवश्यक आहे. पीक २० दिवसाचे असताना पहिली आणि ३० दिवसाचे असताना दुसरी कोळपणी करावी. कोळपणी केल्याने जमीन भुसभूशीत होवून जमिनीत हवा खेळती राहते व त्यायोगे पीक वाढीस पोषक वातावरण तयार होते तसेच जमिनीतील बाष्पीभवनाचा वेग कमी होवून ओल अधिक काळ टिकण्यास मदत होते. कोळपणी शक्यतो वाफशावर करावी. कोळपणीनंतर ऐक खुरपणी करावी. पहिल्या ३०-४५ दिवसात शेत तणविरहीत ठेवावे हे उत्पादनाच्या दृष्टीने आवश्यक असते. हरभरा पिकांत पक्षी थांबे म्हणून ज्वारीच्या दाण्याचा उतवडा करावा. |
| करडई | | पीकच्या जोमदार वाढीसाठी पीक सुरूवातीपासूनच तण विरहीत ठेवणे आवश्यक आहे. पहिल्या ३०-४५ दिवसात शेत तणविरहीत ठेवावे हे उत्पादनाच्या दृष्टीने आवश्यक असते. |
| वाटाणा | पेरणी अवस्था | पिकास थंड हवामान मानवत असल्याने या पिकाची पेरणी करावी. टोकन पद्धतीने पेरणीसाठी ३० ते ४० किलो प्रति हेक्टरी अथवा पेरणी पद्धतीने पेरणीसाठी ७० ते ८० किलो प्रति हेक्टरी बियाणे वापरावे. पेरणीसाठी अरकेल, बोनव्हीला, फुले प्रिया या शिफारशीत जातींची निवड करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशक चोळावे व त्यानंतर रायझोबिम कल्चर २० ग्रॅम प्रति किलो बीजप्रक्रिया करावी. |
| तुर | फुलोरा ते शेंगा भरण्याची अवस्था | तूर पिकावरील पाने गुंडाळणारी अळीच्या नियंत्रणासाठी ५ % निबोंळी अर्काची फवारणी करावी. तूर पिकात वांझ रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच अशी रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. या रोगाचा प्रसार कोळी या किटकामार्फत होतो. कोळी नियंत्रणासाठी रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावी. तसेच तूर पिकाच्या झाडांच्या खोडावर फायटोफथोरा करपा रोगाचे चट्टे दिसून येताच रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. तूर पिकावरील शेंग अळीच्या नियंत्रणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टर लावावेत तसेच ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. तुरीमधील फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये घाटे अळी/पिसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक किड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे यामध्ये तृण धान्याचे आंतरपिक असल्यास किडीचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते, एच .एन.पी.व्ही **(HNPV)** य़ा जैविक किडनियंत्रणाचा वापर करावा .फुलकळी लागताना पहिली फवारणी निबोंळी अर्क ५ % दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १२ ते १५ दिवसांनी हेलीओकील **(HNPV)** ५०० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर व गरजेनुसार तिसरी फवारणी १८.५ % प्रवाही क्लोरॲट्रीनिलीप्रोल १५० मिली अथवा इमामेक्टीन बेझोएट २०० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ वातावरण बघून फवारणी करावी. |
| वांगी | पीक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे वांग्यामध्ये रस शोषक कीडी जसे तुडतुडे, पंढरी माशी, मावा याच्या नियंत्रणासाठी फॉस्फामिडॉन ४० % एस. एस. १५ मिली किंवा फेनप्रोप्यथ्रीन ३० % ई. सी. ५ मिली या कीटकनाशकाच्या आलटून पालटून फवारण्या कराव्यात. अधूनमधून ५ % निंबोळी अर्कची फवारणी स्वच्छ वातावरण बघून करावी. |
| चारा पिक | पेरणी अवस्था | रब्बी हंगामात पशुधनासाठी मका, ओट, बरसीम, लसूण घास या चारा पिकाची पेरणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| जनावरांचे व्यवस्थापन | | रोगप्रसार होऊ नये यासाठी रोगी जनावर वेगळी ठेवातीत. रोगी जनावरांचे मल-मूत्र दूर नेऊन टाकावे. अस्वच्छतेमुळे स्तनदाह होऊ नये यासाठी कासेची स्वच्छता ठेवावी. गोठ्यातील हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वछ पाणी द्यावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : २१.११.२०२३

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**